HE

MGV/HTV - अद्ययावत् मोड्युल

# सुरक्षित ड्रायव्हिंग

वाहन चालविण्याच्या मुलभूत गोष्टी आणि रस्त्याच्या नियमाबाबतची माहितीपुस्तिका



# सुरक्षित ड्रायव्हिंग

वाहन चालविण्याच्या मुलभूत गोष्टी आणि रस्त्यांच्या नियमांबाबतची माहितीपुस्तिका

# प्रकाशनवृत्त

भारताच्या वेगाने होणाऱ्या विकासाबरोबरच अनेक समस्याही उभ्या राहिल्या आहेत. आपल्या रस्त्यांवर वाहनांच्या संख्येत होणाऱ्या वाढीसोबतच तसेच गाडी चालविताना मोबाईलवर बोलणे, दारू पिऊन गाड़ी चालविणे किंवा धूम्रपान करीत गाडी चालविणे, यांसारख्या गोष्टी जीवित आणि मालमत्तेमध्ये हानी होण्याची कारणे ठरत आहेत.

बेदरकारपणे ड्रायव्हिंग केल्यामुळे (वाहन चालविल्यामुळे) होणाऱ्या मृत्यु आणि जखमींच्या घटनांच्या बातम्यांचा ओघ सतत सुरूच असतो. या आकडेवारीचा आपणही एक भाग होऊ नये, यासाठी आपण अत्यंत काळजीपूर्वक राहिले पाहिजे.

सुशिक्षित आणि सजग तसेच अन्य रस्ता वापरकर्त्यांबद्दल सौजन्य बाळगणाऱ्या, कायद्याचा आदर करणाऱ्या आणि रस्ता जबाबदारीने वापरणाऱ्या ड्रायव्हर (वाहनचालकांची) ची संस्कृती निर्माण करणे, हाच आपल्या रस्त्यांवर होणाऱ्या संवेदनहीन मृत्यु रोखण्याचा एकमेव उपाय आहे. आपल्यापैकी प्रत्येकाला वैयक्तिक आणि सामुहीक जबाबदारी घेऊन रस्त्यांची अवस्था बदलणे आणि रस्ता. वापरकर्त्यांची वृत्ती बदलणे शक्य आहे.

प्रकाशित केले. ह्युबर्ट एबनर (भारत) प्रायव्हेट लिमिटेड.
सी-18, चिराग एनक्लेव्ह,
नवी दिल्ली.110048 (भारत)
Tel.: +91 11 46107654
ई–मेल–driving@he-india.com
वेब–www.he-india.com
© सर्व हक्क आरक्षित

आवृत्ती– Feb 2013

या प्रकाशनातील कोणताही भाग/मजकूर प्रकाशकाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही स्वरूपात पुनरूत्पादित, जमा केला जाणार नाही किंवा इलेक्ट्रॉनिक (दृक्–श्राव्य), यांत्रिकी, झेरॉक्स, रेकॉर्डिंग किंवा अन्य कोणत्याही स्वरूपात प्रसारित केला जाणार नाही. सार्वजनिक प्रचारास, वापरास परवानगी नाही.

# अनुक्रमणिका




**HGV– मुलभूत** **1-34**

जबाबदार ड्रायव्हर **1-10**
- ड्रायव्हरच्या (वाहनचालकाच्या) जबाबदाऱ्या 1
- आवश्यक कागदपत्रे 2
- मोटर वाहन नोंदणी (रजिस्ट्रेशन) 3
- नियमित कालावधीने केल्या जाणाऱ्या तपासण्या आणि वाहनाची देखभाल 4
- ओझे आणि वस्तू/मालाची वाहतूक 4
- वाहन आणि मालाची (वाहनातील ओझ्याची) सुरक्षितता 5
- वाहनाचा दुरूपयोग 5
- सामाजिक जबाबदारी 6
- चांगल्या ड्रायव्हरची (वाहनचालकाची) वैष्ट्यिे 6
- आरोग्य आणि स्वास्थ्य 7
- ज्ञान, प्रक्षिण, कौशल्य आणि अनुभव 11
- मदतनीसाच्या जबाबदाऱ्या 11
- वाहतुकीचा भंग आणि दंड 12


**ओझे वाहून नेण्याची प्रक्रिया** **13-16**
- ओझ्याची तपासणी 13
- ओझ्याची सुरक्षितता 14
- माल/वस्तू वाहून नेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे 14
- टँकर 15
- धोकादायक वस्तू/माल वाहून नेणे 15
- अवजड (सामानाने जड झालेली) वाहने हाताळणे 16

**वाहनाबद्दलचे ज्ञान आणि देखभालीचे महत्त्व** **17-24**
- नियमित तपासण्या 17
- प्रवासाच्या मध्ये 18
- प्रवासाच्या शेवटी 18
- साप्ताहिक तपासण्या 19
- ठराविक कालावधीनंतरच्या तपासण्या 19
- ट्रकमध्ये डिझेल वाचवा 19
- धूर निर्मूलन (धूर काढून टाका) 20
- चांगल्या ड्रायव्हिंगसाठी (वाहन चालविण्यासाठी) 6 साध्या सूचना 24
- लक्षात ठेवा 24

**ब्रेकडाऊन/अपघात/टोईंग (वाहन ओढून नेणे)** **25-28**
- ब्रेक नादुरूस्त होणे 25
- अपघात 26
- टोईंग (वाहन ओढून नेणे) 27

**प्रथमोपचार** **29-34**
- रस्ता अपघातामधील जखमींसाठी प्रथमोपचार 29
- डोक्याला झालेली दुखापत/जखमा 29
- मान आणि पाठीच्या कण्याला झालेली दुखापत/जखमा 30
- छातीच्या दुखापतीची लक्षणे 31
- फ्रॅक्चर झाल्याची लक्षणे 31
- बाह्य भागात झालेल्या जखमा किंवा दुखापती, कापले जाणे आणि खरचटणे 32
- भाजणे 33

# अनुक्रमणिका




**HGV– 1** **35-70**

वाहनाचे गतिविज्ञान **37-40**
- गुरूत्वाकर्षण 37
- गति–उर्जा 37
- वाहनाचा वेग 38
- वाहनाची संरचना 38
- रस्त्याच्या पृष्ठभागाला होणारे टायरचे घर्षण 38
- रस्त्याची स्थिती 39
- रस्त्याचे अभियांत्रिकी शास्त्र 39
- ओझे 40
- ब्रेकिंग प्रणाली 40

सुरक्षित ड्रायव्हिंग (वाहन चालविणे) **41-52**
- सुरक्षित वाहन चालविण्याचे तंत्र 41
- हालचाल बंद करणे 41
- रस्त्याच्या बाहेर पडणे 42
- ब्रेकिंग 42
- डावीकडे आणि उजवीकडे वळणे 42
- ओव्हरटेकिंग 43
- उलटे वाहन चालविणे (रिव्हर्स ड्रायव्हिंग) 46
- यू–टर्न 47
- मार्गाचा अधिकार 47
- चौकामध्ये लाईट सिग्नलविाय पोहोचणे 50
- चौकामध्ये लाईट सिग्नलसह पोहोचणे 50
- राऊंडअबाऊट (वळणावळणाचा) 50
- पार्किंग 51
- पार्क केलेल्या वाहनांजवळून जाणे 51

कठीण परिस्थितीत वाहन चालविणे **53-58**
- रस्त्याची स्थिती 53
- विपरीत हवामानाची स्थिती (हवामान) 55

धोक्याची जाणीव (अनुमान) **59-66**
- धोक्याची जाणीव (अनुमान) 59
- वेग कमी करणे आणि ब्रेकचे व्यवस्थापन 63
- दृष्यता 64

आपत्कालीन स्थिती **67-70**
- टायर फुटणे 67
- ब्रेक नादुरूस्त होणे (ब्रेक फेल) 68
- थांबन्याची किया (योग्य हालचाल करणे) 68
- वाहनाला आग लागणे 68
- वाहन घसरणे 69
- ओझे (वाहनातील) हलणे किंवा पडणे 69
- स्टीअरिंग नादुरूस्त होणे 69
- परिपारक दंड एकत्रितरित्या नादुरूस्त होणे 69
- वाहनाच्या कोपऱ्याला घासून जाणे 70
- रिअल ॲक्स नादुरूस्त होणे 70


केंद्र बोल्ट नादूरूस्त होणे. 70
प्रवाहीन इलेक्ट्रिक वायरसी संपर्क येणे 70
पूल किंवा अंडरपासला स्पर्षून जाणे 70



■ **HGV– 2** **71-88**

**वाहनाबद्दलचे ज्ञान** **73-68**
साधारण 73
मोटार वाहनाचा भाग 73
इंजिन 73
वाहनाच्या प्रणाली 74
ब्रेकपध्दती 76
टायर 76
इलेक्ट्रीक प्रणाली 77
इलेक्ट्रीकल उपकरणे 78
वाहनाची देखभाल 79
संकटात सापडल्यास काय करावे (ट्रबल शुटींग) 86

# जबाबदार ड्रायव्हर





अवजड वाहन चालकांची जबाबदारी केवळ त्यांची सुरक्षिततेपर्यंतच मर्यादित नसते, तर त्यांच्या वाहनाची सुरक्षितता आणि त्यामध्ये ते वाहून नेत असलेल्या मालाची सामाजिक आणि कार्यालयीन जबाबदारीही त्यांच्यावरच असते. रस्त्यावर वाहन चालविताना त्यांनी नेहमी एक चांगला वाहनचालक असल्याचा आदर्श समोर ठेवावा आणि अन्य रस्ते वापरकर्त्यांबाबतही त्यांनी सजगता तसेच सौजन्याचे, सभ्यतेचे पालन करावे. चांगले आरोग्य, सकारात्मक दृष्टीकोन आणि वर्तणुक रस्त्यावर सुरक्षित वाहन चालविण्यासाठी आवश्यक असतात. स्वःताचे आरोग्य चांगले राखणे, तब्येत सांभाळणे ही प्रत्येक वाहनचालकाची जबाबदारी आहे. सुरक्षित वाहन चालविण्याच्या क्षमतेवर परिणाम करणाऱ्या कोणत्या गोष्टी आहेत, याबद्दल वाहनचालकाने सतत जागरूक असायला हवे.


## » वाहनचालकांच्या जबाबदाऱ्या

वाहनचालक खालील गोष्टींसाठी जबाबदार असतो.

- तो चालवित असलेल्या वाहनाच्या प्रकाराचे आणि त्या क्षमतेचा परवाना (लायसन्स)
- ते वाहन नोंदणीकृत असावे.
- वाहनाचे आरोग्य. वाहन रस्त्यावर चालविण्यायोग्य ठेवणे, हे वाहनचालकाचे कर्तव्य आहे.
- वाहन चालविताना नेहमी आवश्यक कागदपत्रे, प्रथमोपचाराचे साहित्य, धोक्याचा त्रिकोण आणि सर्व साहित्यासह दुरूस्तीच्या उपकरणांचा सेट, जास्तीचे चाक आणि जॅक (गाडी उचलण्याचे साधन) जवळ बाळगावे.




- वाहून नेत असलेल्या ओझ्याची मालाची सुरक्षितता त्याचबरोबर प्रवाशांची सुरक्षित वाहतूक हे त्याचे कर्तव्य आहे. तो वाहून नेत असलेले माल सुरक्षित आहे ना आणि ते मर्यादेपेक्षा जास्त भरले गेले नाही ना याबाबत त्याने खात्री करून घेतली पाहिजे.
- सर्व परिस्थिती आणि स्थितींमध्ये वाहनांना हाताळायला तो सजग आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम असला पाहिजे. (थकलेला नको/दारू प्यायलेला नसावा किंवा त्याचे लक्ष विचलित नको)
- वाहनामध्ये बसण्याची जागा ही योग्य आणि आरामदायी असवी, ज्यामुळे वाहनचालकांना त्यांच्या गाडीचे नियंत्रक आणि पॅडलपर्यंत सहजपणे पोहोचता येईल आणि स्टीअरिंग व्हील कोणत्याही अडथळयाशिवाय हाताळता येऊ शकेल.
- नेहमी सीटबेल्ट वापरावा.




- त्याची रस्त्यावरील आणि रस्त्याच्या वाहतुकीबद्दलची दृश्यता उत्तम आणि स्वच्छ आहे, याची खात्री करून घ्या. विंडस्क्रीन (समोरील काच) नेहमी स्वच्छ ठेवलेली आणि ड्रायव्हींग आरसे योग्यरित्या जुळवून घेतलेले असावेत.
- वाहन पर्यावरणीय योग्य दृष्ट्या चालविणे–अचानक वेग वाढविणे किंवा ब्रेक लावणे टाळण–थांबण्याच्या ठिकाणी लाईट्स बंद करणे आणि सावकाष निघणे.

# जबाबदार ड्रायव्हर

## » आवश्यक कागदपत्रे

व्यावसायिक वाहनचालकाला तो चालवित असलेल्या वाहनाच्या सर्व आवश्यक कागदपत्रांची माहिती तसेच तो वाहनचालक आहे, हे स्पष्ट करणाऱ्या वैयक्तिक कागदपत्रांची माहिती असावी.

सर्व कागदपत्रे नेहमी तयार तसेच अद्ययावत ठेवणे ही त्याची जबाबदारी असते, उदा- वाहन चालविण्याच्या परवान्याचे नूतनीकरण, रस्ता कर आणि परवाना. वाहतुकीच्या नियम आणि शिस्त याबद्दल तो पूर्णपणे परिचित असावा.




वाहन चालविताना वाहनचालकाने खालील कागदपत्रे जवळ बाळगणे आवश्यक आहे.

- वाहन चालविण्याचा वैध परवाना
- वाहनाचे नोंदणी केलेले प्रमाणपत्र
- जसे लागू असेल तसे रस्ता कर प्रमाणपत्र
- प्रवासी कर/माल कर
- माल पाठविण्याची पावती/इन्शुरन्स
- इन्शुरन्स प्रमाणपत्र
- प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र
- वाहनाचे प्रमाणीकृत प्रमाणपत्र/परमीट
- लागू असल्यास ट्रम्प कार्ड आणि रस्त्याचा नकाशा (धोकादायक माल वाहनांबाबत आवश्यक)

गणवेषात असलेला पोलीस अधिकारी किंवा वाहतूक विभागाचा अंमलबजावणी अधिकारी आणि अधिकृत कंपनी अधिकारी कोणत्याही वेळेस ही कागदपत्रे तपासू शकतात.

वैध प्रमाणपत्र सादर न करणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे, अशा वेळेस वाहनही जप्त होऊ शकते.

## वाहन चालविण्याचा परवाना

वाहन चालविण्याचा परवाना हा परवाना धारकाला खालीलपैकी एक किंवा त्यापेक्षा जास्त प्रकाराचे मोटार वाहन चालविण्याचा अधिकार देते.

- गिअरशिवाय मोटारसायकल
- गिअरसह मोटारसायकल
- तीनचाकी
- हलके मोटार वाहन (खासगी/व्यावसायिक)
- प्रवासी वाहन (माल/प्रवासी)
- विशिष्ठ मोटार वाहन

अवजड वाहन चालविण्यासाठी वाहनचालकाकडे अवजड वाहन चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक आहे, (एचएमव्ही/एचटीव्ही/एचपीव्ही)




## वाहन चालविण्याच्या परवानाची वैधता

जर तुमचा परवाना व्यावसायिक प्रवासी किंवा माल घेऊन जाणारे वाहन असेल, तर परवाना दर तीन वर्षांनी किंवा परवाना देणाऱ्या यंत्रणेच्या करारानुसार नूतनीकरण केले पाहिजे. मात्र जर तुम्हाला धोकादायक रासायनिक पदार्थ घेऊन जाण्याची मान्यता असेल, तर मात्र तुम्हाला आवश्यक असलेला धोकादायक रासायनिक पदार्थाविषयक ताजा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, त्या परवान्याचे दरवर्षी नूतनीकरण करावेच लागेल.

## वाहन चालविण्याच्या परवान्याचे नूतनीकरण

वाहन चालविण्याच्या परवान्याची मुदत संपल्यानंतर 30 दिवसांच्या आत तुम्हाला परवान्याचे नूतनीकरण केले पाहिजे. परवान्याची मुदत संपल्यानंतर 30 दिवसांनी वाहन चालविणे हा गुन्हा आहे. तर व्यावसायिक परवान्याचे दर तीन वर्षांनी एकदा नूतनीकरण केले पाहिजे.

### आवश्यकता

- फॉर्म क्रमांक ९ मधील अर्ज
- वय आणि निवासाचा दाखला
- आवश्यक असेल तेथे वैद्यकीय प्रमामपत्र
- सध्याचा वाहन चालविण्याचा परवाना
- पासपोर्ट आकाराचे तीन फोटो
- प्रशिक्षण अभ्यासक्रम प्रमाणपत्रे
- लागू असलेले शुल्क.

### परवाना हरविल्यास

परवाना हरविल्यास त्याबद्दल ताबडतोब परवाना दिलेल्या कार्यालयात तक्रार दिली गेली पाहिजे. परवान्याची नक्कल किंवा दुसरी प्रत मिळविण्यासाठी खालील प्रक्रियेचे पालन करा.

- सर्व माहिती आणि तपशीलासह पोलीस स्टेशनमध्ये परवाना हरविल्याची तक्रार द्या.
- व्यावसायिक परवाना हरविल्यास वाहतूक पोलीसांकडून चलन अहवाल मिळवा.
- अर्ज भरा (परवाना हरविल्याचाकिंवा खराब झाल्याची सूचना आणि नकलेसाठी/दुसऱ्या प्रतीसाठी केलेला अर्ज)
- तुमच्या हरविलेल्या परवान्याची झेरॉक्स.
- वय आणि निवासाचा दाखला.
- लागू असलेले शुल्क.

तुमच्या स्वतःच्या फायद्यासाठी, नेहमी तुमच्या वाहन चालविण्याच्या परवान्याची झेरॉक्स किंवा तुमच्या परवान्याचा नंबर, तारीख आणि ज्या प्राधिकरणाकडून लागू केले त्याची माहिती, हे जवळ बाळगा.

## » मोटार वाहनाचे नोंदणीकरण

### नोंदणीकृत क्रमांक/नंबर

वाहन नोंदणीकृत असल्याशिवाय आणि त्याचा नोंदणी क्रमांक असल्याशिवाय ते चालविता येत नाही.




नोंदणीची खूण, वाहतूक प्राधिकरणाकडून दिला गेलेला क्रमांक हा असा असला पाहिजे.

- मोटार वाहनाच्या पुढील तसेच मागील बाजूस लावला पाहिजे.
- ठराविक अंतरावरूनही स्पष्ट दिसू शकेल अशा स्पष्ट केलेल्या आकाराचा असावा. विचित्र पध्दतीने लावलेला क्रमांक बेकायदेशीर आहे आणि शिक्षापात्र गुन्हाही आहे.

"च्या साठी अर्ज केला आहे" अशा नंबरप्लेटसह वाहन चालविण्यास परवानगी नाही.

नंबर प्लेटवरील अक्षरांचा आकार, आकडे तसेच रंगसंगती हे सर्व कायद्यानुसार नियंत्रित होते.

संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही शिक्षा किंवा कायदेशीर कारवाई होऊ नये यासाठी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करा.

### "प्रदुषण नियंत्रण " प्रमाणपत्र

तुमच्या वाहनाला वैध "प्रदुषण नियंत्रण" प्रमाणपत्र असलेच पाहिज.




बहुतेक राज्यांमध्ये या प्रमाणपत्राची वैधता तीन ते सहा महिन्यांपासून वेगवेगळी असते. या आवश्यकता काय आहेत त्याबद्दल जागरूक असणे तसेच राज्याचे नियम आणि मार्गदर्शक तत्वांनुसार चालणे खूप महत्त्वाचे आहे.

### वाहन तंदुरूस्ती प्रमाणपत्र

केवळ सुरक्षित आणि योग्यरित्या देखभाल केलेल्या वाहनांनाच रस्त्यांवर चालण्याची परवानगी असते. जर वाहन दोन वर्षांपेक्षा जास्त जुने झाले तर ते रस्त्यावर चालविण्यायोग्य आहे याबाबत दरवर्षी फिटनेस तेपासणी करणे आवश्यक आहे.

# जबाबदार ड्रायव्हर

## » ठराविक कालावधीने केलेली तपासणी आणि वाहनाची देखभाल

केवळ रस्त्यावर चालण्यायोग्य असलेल्या वाहनांनाच रस्त्यावर उतरण्याची परवानगी असते. याचा अर्थ वाहनाचे सर्व यांत्रिक आणि इलेक्ट्रीकल भाग योग्यरित्या काम करीत असले पाहिजेत आणि वाहनाची योग्य देखभाल केलेली असावी. चालवित असलेले वाहन चालण्यायोग्य सुरक्षित स्थितीत ठेवणे ही चालकाची जबाबदारी असते. वाहनाची वेळोवेळी योग्यरित्या देखभाल केलेली असावी आणि ते कोणत्याही वेळेस सुरक्षित चालू शकेल इतक्या उत्तम अवस्थेत असावे.

सुरक्षितपणे वाहन चालविण्यासाठी वाह चालविण्यापूर्वीची तसेच दैनंदिन तपासणी आवश्यक आहे.

जर तुम्हाला वाहनामध्ये एखादा बिघाड आढळला, तर तो दुरूस्त होईपर्यंत तुमचा प्रवास सुरू करू नका.

वाहन चालविताना दरवेळेस उपकरणांच्या पॅनेलवर, आरशांवर तसेच वाहनाच्या आवाज नजर ठेवा. जर कोणताही

धोक्याचा इशारा देणारे लाईट लागले, घंटा वाजली किंवा वास आला किंवा तुमचे वाहन नेहमीसारखे सुरळीतपणे चालत नसल्यासारखे तुम्हाला वाटले तर त्वरित वाहन थांबवा आणि काय समस्या आहे ते शोधून काढा.




जर समस्या सापडली नाही किंवा सोडविली गेली नाही, वाहन सुरक्षितपणे चालविता येऊ शकते की नाही याचा निर्णय घ्या किंवा ते वाहन जवळच्या वर्क शॉपमध्ये उचलून नेण्याची गरज आहे का याबाबत निर्णय घ्या.

वाहन चालविण्यापूर्वी तपासणी, पेट्रोल पंपांवर कालांतराने केली जाणारी तपासणी आणि नियमित सर्व्हिसिंग यामुळे वाहन चालविताना येणाऱ्या समस्या कमी होऊ शकतात आणि देखभाल खर्चही कमी होतो.

## » माल / वस्तु वाहून नेणे

ओझे हा एक महत्त्वाचा घटक वाहनांची स्थिरता, नियंत्रण आणि कौशल्य यांच्यावर प्रभाव पाडतो. प्रत्येक वाहनाची ओझे वाहून नेण्याची एक ठरावीक क्षमता असते तसेच प्रवाशांच्या संख्येचीही ठरावीक क्षमता आहे.




वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त ओझे त्यामध्ये लादल्यामुळे वाहन खराब होऊ शकते तसेच वाहनावरील नियंत्रणही जाऊ शकते. यामुळे अत्यंत धोकादायक स्थिती निर्माण होऊ शकते तसेच वाहन चालविताना नियंत्रणही जाऊ शकते.

- वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त ओझे लादू नका. नेमून दिलेल्या मर्यादा ओलांडू नका. (किलोग्रॅम / लांबी / रूंदी / उंची)
- वाहतूक केली जाणारी प्रत्येक वस्तू किंवा पाकिट हे सुरक्षित ठिकाणीच ठेवा. त्याची काळजी घ्या.
- कधीही खिळे, पाण्याच्या बाटल्या, आग विझविण्याची साधने, स्टोव्ह, बादल्या, ओढण्याची साखळी, इत्यादी वस्तू असुरक्षित केबिनमध्ये सुट्या ठेवू नका. समजा तुमच्याकडून अचानक ब्रेक लागला, तर या वस्तू तुमच्या केबिनमध्ये इतरत्र पसरू शकतात आणि धोकादायक ठरू शकतात, त्यामुळे तुम्हाला किंवा तुमच्या मदतनीसाला धोका पोहोचू शकतो. यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटू शकते.

